

# संपादकीय

**श्री. अजय ब्रम्हेचा**
अध्यक्ष
दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि.

फेडरेशनची सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पुण्यातील कॉसमॉस को-ऑप. बँकेच्या कॉसमॉस टॉवर येथील नोंदणीकृत कार्यालयात दि. २८ सप्टेंबर, २०२४ रोजी व्यवस्थितरित्या पार पडली. फेडरेशनच्या इतिहासात प्रथमच मुंबई बाहेर फेडरेशनची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात राज्यातील विविध जिल्ह्यांमधून नागरी सहकारी बँकांच्या प्रतिनिधींनी सभेस आपली उपस्थिती लावली होती. यापूढेही राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये फेडरेशनच्या वार्षिक सभा आयोजित करण्याचा आमचा प्रयत्न राहील, जेणेकरुन राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या बँकांमार्फत आम्ही पोहचू शकू.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने फेडरेशन सर्व प्रकारचे कार्यालयीन कामकाज उत्तमप्रकारे व समाधानकारकपणे करुन आपल्या लौकिकास साजेशी कामगिरी नेहमीच करत आलेली आहे. केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, सहकार खाते यांच्याकडून जारी केल्या जाणाऱ्या विविध योजनांबाबत तथा कायद्यातील घडामोडी इ. बाबत अद्ययावत माहिती नागरी सहकारी बँकांना उपलब्ध/अवगत करुन देण्याचे कार्य फेडरेशन करीत असते. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरणपूर्व समिती, स्थायी सल्लागार समिती, टॅफकब समिती इ.च्या माध्यमातून फेडरेशन सभासद नागरी सहकारी बँकांच्या विविध समस्यांचे निवारण करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असते. भारतीय रिझर्व्ह बँकेने महाराष्ट्रासाठी निर्माण केलेल्या टॅफकबच्या मुंबई विभागासाठी होणाऱ्या सभांना मी स्वत: तर नागपूर विभागासाठी होणाऱ्या सभांना फेडरेशनचे संचालक श्री. सत्यनारायणजी लोहिया तसेच बहुराज्यीय नागरी सहकारी बँकांसाठी असलेल्या टॅफकबच्या सभांसाठी फेडरेशनचे संचालक श्री. सुनिलजी देवडा हे फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी व सचिव यांचे समवेत उपस्थित राहून नागरी सहकारी बँकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्याकरिता आम्ही टॅफकबवरील बँकांची पूर्वसभा बोलावून बँकांच्या समस्या जाणून घेऊन त्या टॅफकब समितीसमोर मांडतो. फेडरेशनने सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे राज्यातील अडचणीत असलेल्या नागरी सहकारी बँकांपैकी सुमारे १२२ बँकांना SAF मधून बाहेर काढण्यात फेडरेशनला यश आले आहे. तथापि ज्या बँका अद्यापही SAF मध्ये आहेत, त्यांनी आर्थिक वर्षात चांगली कामगिरी करुन SAF मधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करावा. यात फेडरेशनतर्फे योग्य ते सहकार्य संबंधित बँकांना निश्‍चितपणे केले जाईल.

त्याचबरोबर बँकांना दैनंदिन कामकाजामध्ये येणाऱ्या अडचणींबाबत पत्राद्वारे सतत मार्गदर्शन देखील फेडरेशन करीत असते. आजमितीस अनेक धोरणात्मक निर्णय बँकांच्या बाजूने लावण्यात फेडरेशनला यश मिळाले आहे. गेल्या आर्थिक वर्षात सोनेतारण कर्जाची मर्यादा (Bullet Repayment) वाढवण्यात, सामोपचार/एकरक्कमी कर्ज परतफेड योजना, तांत्रिक निर्लेखन इ. सारखे धोरणात्मक निर्णय बँकांच्या बाजूने लावण्यात फेडरेशन यशस्वी झाली आहे. त्याचबरोबर बँकांना दैनंदिन कामकाजामध्ये येणाऱ्या अडचणींबाबत पत्राद्वारे सतत मार्गदर्शन देखील फेडरेशन करीत असते. आजमितीस अनेक धोरणात्मक निर्णय बँकांच्या बाजूने लावण्यात फेडरेशनला यश मिळाले आहे.

गेल्या आर्थिक वर्षात सोनेतारण कर्जाची मर्यादा (Bullet Repayment) वाढवण्यात, सामोपचार/एकरक्कमी कर्ज परतफेड योजना, तांत्रिक निर्लेखन इ. सारखे धोरणात्मक निर्णय बँकांच्या बाजूने लावण्यात फेडरेशन यशस्वी झाली आहे.

मागच्याच महिन्यात रिझर्व्ह बँकेने आयोजित केलेल्या व डेप्युटी गव्हर्नर मा. श्री. एम राजेश्वर राव यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या स्थायी सल्लागार समितीमध्ये आपल्या बँकांच्या इतरही अनेक समस्या, प्रश्न सादर करण्यात आले. ज्यामध्ये अग्रक्रम क्षेत्रास कर्ज पूरवण्याचे असलेले उद्दिष्ट कमी करणे, शिवाय अशी उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी त्याला पुन्हा मुदतवाढ मिळवून देणे, अग्रक्रम क्षेत्राच्या कर्ज पूरवठ्यात वाढ करणे, बँकेच्या एकूण कर्जापैकी ५०% कर्जे रु. २५.०० लाखापर्यंत असणाऱ्या अटीत शिथिलता आणणे, सोनेतारण बुलेट रिपेमेंटची वाढीव कर्ज मर्यादा अग्रक्रम क्षेत्राशी न जोडणे, Cost to Income Ratio च्या निकषाचा पूर्नविचार करणे, MSF/LAF ची सुविधा नॉन शेड्युल्ड बँकांना पण मिळवून देणे, घरतारण कर्जे/घरदुरुस्तीची कर्जे कमर्शिअल रिअल इस्टेट मधून वगळणे, इ. अशा अनेक विषयांचा समावेश आहे. रिझर्व्ह बँकेने त्यावर पूर्नविचार करण्याचे, हे issues re-examine करण्याचे आश्वासनही आम्हास दिले आहे.

दरम्यान आम्ही तसेच गुजरात फेडरेशनचे अध्यक्ष, नॅफकबचे अध्यक्ष व काही संचालक यांनी मा. केंद्रीय सहकार मंत्री श्री. अमितजी शाह यांची दिल्लीला भेट देखील घेतली. त्यांच्या सहकार्यामुळेच अग्रक्रम क्षेत्रास कर्ज पूरवठ्याचे उद्दिष्ट तसेच छोट्या रक्कमांच्या कर्जांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या रिझर्व्ह बँकेच्या आदेशास मुदतवाढ देण्यात आली. अजुनही अनेक समस्या मा. केंद्रीय सहकार मंत्र्यांच्या सहाय्याने सोडविण्याचा आमचा प्रयत्न राहील. त्यांच्या मार्गदर्शनाखाली निश्चितच नागरी सहकारी बँकांना चांगले दिवस येतील, याची आम्हाला खात्री आहे.

परंतु आपणही आपल्या परीने उच्च दर्जाचे व्यावसायिक धोरण अंगीकारले पाहिजे. आधुनिकीकरणाची कास धरुन नवनवीन तंत्रज्ञान स्वीकारले पाहिजे, तरच आपण आपल्या कामकाजाची गुणवत्ता आणखी वाढवू शकू. त्याचबरोबर आपल्याकडे कार्यकुशल अधिकारी व प्रशिक्षित कर्मचारी वर्ग असल्यास या सर्वांच्या सहाय्याने आपण बँकेचे सभासद, ग्राहक, ठेवीदार यांचा विश्वास संपादन करु शकू व त्यांच्या सहकार्याने आपल्याला संस्थेचा सर्वांगीण विकास साधता येईल.

वार्षिक सभेनंतर सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात उत्तम कामगिरी केलेल्या बँकांना सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमासाठी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मा. श्री. मुरलीधरजी मोहोळ यांनी मुख्य अतिथी तर रिझर्व्ह बँकेचे संचालक मा. श्री. सतिशजी मराठे व मा. सहकार आयुक्त व निबंधक श्री. दिपक तावरे यांनी सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थिती लावली होती. या प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते नागरी सहकारी बँकांना सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार देण्यात आला. सदरहू पुरस्कार देण्याकरिता राज्यातील नागरी सहकारी बँकांकडून विविध निकषांवर आधारित अर्ज मागविण्यात आले होते. त्यास एकूण १२१ बँकांनी प्रतिसाद दिला. पैकी २९ नागरी सहकारी बँकांची निवड सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कारासाठी करण्यात आली. भविष्यात अधिकाधिक उत्तम कामगिरी करण्यास बँकांना उत्तेजन मिळावे, याकरिता हा उपक्रम फेडरेशनद्वारा राबविला जातो. बँकांना मिळालेल्या या पुरस्कारात बँकेचे सभासद, ग्राहक, हितचिंतक, संचालक मंडळ, अधिकारी-कर्मचारी वर्ग यांचा मोठा वाटा आहे. या सर्वांच्या नि:स्वार्थ सेवेमुळेच, एकत्रित सहकार्यामुळेच हे यश संपादन करणे पुरस्कार प्राप्त बँकांना शक्य झाले आहे. त्यामुळे या सर्व बँकांचे पुन्हा एकदा अभिनंदन आणि इतर बँकांनीही भविष्यात उत्तमोत्तम कामगिरी करावी यासाठी मी त्यांना शुभेच्छा देतो.

जय हिंद, जय सहकार!!!

*****